**प्रेस नोट** दिनांक. १२/०८/२०२२

**आरोपी लोकसेवक संदीप आश्रोबा तमशेटे वय ३६ वर्षे व्यवसाय महसुल सहायक नेमणुक तहसिल कार्यालय सेलु ता. सेलु. जि. परभणी रा. पेठ विभाग, वाणी गल्ली, चारठाणा ता. जिंतुर ह. मु. तहसील वसाहत सेलु. महसुल विभाग वर्ग ३ यांनी १०००/— रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी. |
| पोलीस स्टेशन | सेलु |
| गुन्हा नोंद व कलम | गु.र.नं. ३२२/२०२२, क. ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | संदीप आश्रोबा तमशेटे वय ३६ वर्षे व्यवसाय महसुल सहायक नेमणुक तहसिल कार्यालय सेलु ता. सेलु. जि. परभणी रा. पेठ विभाग, वाणी गल्ली, चारठाणा ता. जिंतुर ह. मु. तहसील वसाहत सेलु. महसुल विभाग वर्ग ३ |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/— रू. ( दोन हजार रूपये ) |
| थोडक्यात माहीती | सदर गुन्हयातील तक्रारदार सिध्दार्थ दामोधर वाघमारे वय ३० वर्षे व्यवसाय मजुरी रा. खवणे पिंप्री ता. सेलु जि. परभणी यांनी दि.०१/०८/२०२२ रोजी लाप्रवि परभणीचे अधिकाऱ्यांना फोन करून सेलु येथे बोलावून घेवून समक्ष तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडील दामोधर वाघमारे हे माहे मे २०२१ मध्ये मयत झालेले आहे. महाराष्ट्र शासनाचे संजय गांधी योजने मधील राष्ट्रीय कुटुंब लाभ योजने अंतर्गत अर्थसहाय मिळण्यासाठी त्यांनी त्यांची आई लता वाघमारे यांचे नावे तहसील कार्यालय सेलु येथे प्रत्यक्ष व ऑनलाईन अर्ज केला आहे. सदर आर्थीक मदत मिळण्यासाठी तहसील कार्यालय सेलु येथे कारकुन तमशेटे यांचेकडे ते चकरा मारत आहेत. दिड महिन्यापुर्वी तमशेटे यांनी तक्रारदार यांचे आईच्या नावे केलेल्या अर्जात आर्थिक मदत मिळवुन देण्यासाठी ४०००/— रू ची मागणी केली असता तक्रारदार यांनी आलोसे हे काम करणार नाही म्हणुन तक्रारदार यांनी तमशेटे यांना १५००/— रू दिले. त्यानंतर दि. २९/०७/२०२२ रोजी तक्रारदार यांनी तमशेटे यांना भेटून कामाबाबत विचारणा करता तक्रारदार यांना आलोसे तमशेटे यांनी १०००/— रू लाचेची मागणी केली. म्हणुन तमशेटे कारकुन, तहसिल कार्यालय सेलु यांचे विरूध्द कार्यवाही करावी वगैरे मजकुरची तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरून दि.०१/०८/२०२२ रोजी दोन शासकीय पंचाना लाप्रवि कार्यालयास बोलावून घेवून तहसिल कार्यालय सेलु येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे संदीप आश्रोबा तमशेटे वय ३६ वर्षे व्यवसाय महसुल सहायक नेमणुक तहसिल कार्यालय सेलु ता. सेलु. जि. परभणी रा. पेठ विभाग, वाणी गल्ली, चारठाणा ता. जिंतुर ह. मु. तहसील वसाहत सेलु. महसुल विभाग वर्ग ३ यांनी पंच क्र. १ राठोड यांचे समक्ष तक्रारदार यांना त्यांचे आईला महाराष्ट्र शासनाचे संजय गांधी योजनेमधील राष्ट्रीय कुटुंब लाभ योजने अंतर्गत अर्थसहाय मिळवून देण्याचे १०००/— रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दि.११/०१/२०२२ रोजी तहसिल कार्यालय सेलु येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे संदिप तमशेटे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडुन १४.३७ वा. लाचेची रक्कम स्विकारली म्हणून आलोसे संदीप आश्रोबा तमशेटे यांना लाचेची रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले. तक्रारदार वाघमारे यांचे तक्रारीवरून आलोसे संदीप आश्रोबा तमशेटे वय ३६ वर्षे व्यवसाय महसुल सहायक नेमणुक तहसिल कार्यालय सेलु ता. सेलु. जि. परभणी रा. पेठ विभाग, वाणी गल्ली, चारठाणा ता. जिंतुर ह. मु. तहसील वसाहत सेलु. महसुल विभाग वर्ग ३ यांचे विरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |

सदरची कार्यवाही मा. डॉ. श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, लाप्रवि नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. धरमसिंह चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक, लाप्रवि नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, श्री सदानंद वाघमारे पोलीस निरीक्षक, पोह/मिलींद हनुमंते, पोना/अनिल कटारे, पोना/शेख मुकीद चापोना/जर्नाधन कदम ए.सी.बी. परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणाऱ्या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७      टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID -** dyspacbparbhani@gmail.com

डॉ. श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड – ९४२०६१०६१९
श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नांदेड – ९९२३४१७०७६
श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी. – ७०२०२२४६३१
श्री. सदानंद वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी – ९८२३६१६१४२
श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी – ९८८११४१२१८